# पुणे महानगरपालिका

## *शहर सुधारणा समिती *

## कार्यपत्रिका क्र. ३

**शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.२४/५/२०१९ रोजी सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता स्थायी समिती सभागृह,दुसरा मजला पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

### मा. सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ३०**

मा.बापू कर्णे गुरुजी व मा.सुनिता गलांडे यांचे दि.१६/५/२०१९ चे पत्र

महापालिकेच्या मालकीच्या जागावरील शाळा कार्यालये, गार्डन प्लेग्राउंड,क्रिडांगणे,ॲमिनिटी स्पेस व समाजमंदिरे यांच्यावर अतिक्रमणे झाली आहेत. नेमके किती अतिक्रमण झाले आहे ते आजुबाजुचे नागरिकांना किंवा कर्मचा–यांनाही माहिति नसते. त्यामुळे विनामोबदला केवळ अतिक्रमण करून परस्पर वापर करतात. अतिक्रमण केलेल्या जागा भाडयाने देतात हे थांबविण्यासाठी महापालिकेने आपल्या मालकीच्या विविध वापराच्या किंवा मोकळया जागा,किंवा ॲमिनिटी मनपा रेकॉर्डप्रमाणे मोजणी करून प्रत्यक्ष जागेवर संबंधितांचे ताब्यात मोजणीचे क्षेत्रफळासह नकाशे उपलब्ध करून दयावेत तसेच मोकळया जागेत कंपाउंड दर्शनी भागात हे नकाशे लावण्यात यावेत. तरच आजुबाजुचे नागरिकांचे किंवा मनपा कर्मचा–यांना झालेले अतिक्रमण लक्षात येईल.

महापालिकेच्या जागा प्लॅट, सर्व कार्यालये, शाळा मोकळया जागा, क्रिडांगणे,गार्डन या जागाचे संरक्षण करण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभारावी.

मनपाच्या सर्व जागाची प्लॉट वगैरे बाबी दर ६ महिन्यांनी अहवाल स्वरूपात स्थायी समिती मार्फत मुख्य सभेचे निदर्शनास आणावी.

### टी.डी. आर.चे विषय

**विषय क्र. ३१**

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०१९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/२६,दि.६/५/२०१९ चे पत्र.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.५२६ फा प्लॉ क्र.२७८ सब प्लॉ.क्र. ३ते ९ महात्मा फुले पेठ पिंपळमळा पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | श्री लक्ष्मीनारायण रियॅलिटी प्रा.लि. | सुधारीत नियमावली दि.१५(१)–५ नुसार झोन नाहीत | १०९६१.१६६ चौ.मी.( पुनर्वसन योजनेचा अंशत: भोगवटा आदा केलेपोटी निर्माण होणारा ३०% अनुज्ञेय टीडीआर) | ००४५६४ | मे २०१९ |

**विषय क्र. ३२**

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०१९ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/३४,दि.१३/५/२०१९ चे पत्र.

| अ. क्र. | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी. | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे बालेवाडी स.नं.२९/१/२ (पैकी) | प्रायमरी स्कूल/हायस्कूल (पीएस/एचएस –१/बी) व १८ मी.डी पी रस्ता | मे.ब्रम्हाकॉर्प लिमिटेड तर्फे अधिकृत संचालक रामकुमार अगरवाल | विरळ वस्ती | ३८७७.०० चौ.मी | ३८७७.०० चौ.मी. x २.१५ =८३३५.५५ चौ.मी. | ००५५३५ | मे २०१९ |

## प्रशासनाकडील विषय

**विषय क्र. ३३**

पुणे पेठ कात्रज, जुना जकात नाका येथील पीएमपीएमएल टर्मिनल इमारतीच्या टेरेस वरील वाहनतळ ३ वर्ष कालावधीसाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर चालविणेस देणेबाबत.मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/३८ दि.१४.५.२०१९ चे पत्र.

**विषय क्र. ३४**

महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड यांना, पुणे मेट्रो प्रकल्पाच्या पार्किंग आणि स्टेशन सुविधासाठी पुणे महानगरपालिकेची बोपोडी स.नं.१० सी.टी.एस.क्र.३३५९,३३६० येथील सुमारे २४०० चौमी जागा विना–निविदा उपलब्ध करून देणेबाबत . मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/२३ दि.६.५.२०१९ चे पत्र

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ३५**

मा.आबा बागुल यांचे दि.५/३/२०१९ चे पत्र

आगामी ५० वर्षाचा विचार करून शहराची वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी सूक्ष्म आराखडा (मायक्रो प्लॅन) तयार करण्यात यावा. त्यासाठी अगोदर ट्रॅफिक प्लॅनरची नियुक्ती करण्यात यावी. आजमितीस आपल्याकडे ट्रॅफिक प्लॅनरच नाही. त्यामुळे वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस जटिल होत आहे. विकासकामे होत राहतील. उड्डाणपुले उभारले जातील मात्र वाहतूक व्यवस्था सुलभ असणे अनिवार्य आहे. सबब ट्रॅफिक प्लॅनरची नियुक्ती करून स्वतंत्र कक्ष तातडीने निर्माण करण्यात यावा. विस्तारणा–या शहरासाठी सध्या मेट्रो बीआरटी एचसीएमटीआर आदींना मान्यता मिळालेली आहे. अशा शहराच्या विकासासाठी महत्वाच्या प्रकल्पांच्या कामांमध्ये एकसूत्रता असणे आवश्यक आहे.

शहरासाठी ट्रॅफिक प्लॅनर सेल उभारून तो २४ बाय ७ कार्यान्वित करण्याबरोबरच पोलीस विभागाशी संगणीकृत कनेक्टिव्हिटी असणे काळाची गरज आहे.याकामी पुढील कार्यवाही तत्परतेने करावी.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका